RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ३८] शुक्रवार, जून १२, २०२६/ ज्येष्ठ २२, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक ९४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जून, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३.**

क्रमांक बेस्ट-२५२६/प्र.क्र.३२०/नवि-२१.— ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाकडून, (यापुढे ज्यास "उक्त उपक्रम" असे संबोधण्यात आले आहे.) बृहन्मुंबईत विद्युत पुरवठा व परिवहन सेवा प्रदान करण्यात येत आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३ (महा. अधिनियम क्र. २९ सन २०२३) च्या कलम २ मधील खंड (क) च्या उपखंड (एक), (दोन) व (पाच) अन्वये विद्युत पुरवठा व परिवहन सेवा या अत्यावश्यक सेवा (यापुढे "सदर अत्यावश्यक सेवा" असा उल्लेख करण्यात येईल) आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त उपक्रमामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सदर अत्यावश्यक सेवांमध्ये कार्यरत असलेले कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी संपावर जाण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त उपक्रमामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सदर अत्यावश्यक सेवांमध्ये कार्यरत कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांचा संप प्रतिबंधित करणे जनहिताच्या दृष्टीने आवश्यक असल्याची महाराष्ट्र शासनाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३ (महा. अधिनियम क्र. २९ सन २०२३) च्या कलम २ मधील खंड (क) च्या उपखंड (एक), (दोन) व (पाच) यासह कलम ४ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त उपक्रमामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सदर अत्यावश्यक सेवांमध्ये कार्यरत कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांच्या संपास दिनांक १५ जून, २०२६ पासून मनाई करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विद्या हम्पय्या**
शासनाच्या सहसचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 12th June, 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Essential Services Maintenance Act, 2023.

No. BEST-2526/C.R.320/UD-21.— Whereas, The Brihan-Mumbai Electric Supply and Transport Undertaking of the Municipal Corporation of Brihan-Mumbai (hereinafter referred to as "the said Undertaking") is engaged in the electric supply and transport services in the Brihan-Mumbai;

And whereas, the supply of electricity and transport services are the essential services (hereinafter referred to as "the said essential services") within the meaning of sub-clauses (*i*), (*ii*) and (*v*) of clause (*a*) of section 2 of the Maharashtra Essential Services Maintenance Act, 2023 (Mah. XXIX of 2023);

And whereas, employees and contractual employees engaged in the said essential services provided by the said Undertaking, are likely to go on strike;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that, it is necessary, in public interest, to prohibit the strike of the said employees and contractual employees engaged in the said essential services provided by the said Undertaking.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 read with sub-clauses (*i*), (*ii*) and (*v*) of clause (*a*) of section 2 of the Maharashtra Essential Services Maintenance Act, 2023 (Mah. XXIX of 2023), the Government of Maharashtra hereby prohibits the strikes from 15th June, 2026, by the said employees and contractual employees engaged in the said essential services provided by the said Undertaking.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIDYA HAMPAYYA,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.